## महत्त्वाचे

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी पोलीस बॉईज या संघटनेने विभागीय आयुक्तांकडे केली आहे. कराड नगरपालिका निवडणुकी वेळी बंदोबस्तावर कार्यरत असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना चरेगावकर यांनी धमकावले. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी संघटनेची मागणी असल्याचे अध्यक्ष रवी वैद्य, राहुल लहाने, ज्ञानोबा धुमाळ, अरुण सदाशिवे, अरुण दाभाडे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे निवडणुकीसाठी बैठक

औरंगाबाद : आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसची एक बैठक नुकतीच राष्ट्रवादी भवनात जिल्हाध्यक्ष आ. भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी चिकटगावकर, माजी अध्यक्ष सुधाकर सोनवणे, औरंगाबाद तालुका अध्यक्ष अनिल पाटील फंड, पुंडलिकराव अंभोरे, शिवाजी गावंडे, पांडुरंग पाटील तांगडे, उदयराज पवार यांची भाषणे झाली. सुखदेव पाटील यांनी आभार मानले.

### राजीव तांबे यांचे व्याख्यान

औरंगाबाद : शारदा मंदिर कन्या प्रशालेतील १९८८ च्या माजी विद्यार्थिनींतर्फे बाल साहित्यिक राजीव तांबे यांचे स.भु. शिक्षण संस्थेच्या परिसरात तीन दिवस व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. २ डिसेंबर रोजी सरस्वती भुवन प्रशालेत, ३ डिसेंबर रोजी शारदा मंदिर कन्या प्रशालेत आणि ४ डिसेंबर रोजी 'दहावीचा अभ्यास व पालक' या विषयांवर ते व्याख्यान देतील. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही व्याख्याने सकाळी ९.३० ते १२.३० वाजेदरम्यान होतील. या कार्यक्रमात पालकांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन माजी विद्यार्थिनींनी केले आहे.

**धक्कादायक : जि. प. समाजकल्याण विभागाचा प्रताप**

# मागासवर्गीयांचा निधी पळवला

विजय सरवदे ● औरंगाबाद

**जिल्हा** परिषदेच्या उपकराचा सर्वाधिक निधी हा समाजकल्याण विभागाच्या वाट्याला येतो. त्यातून ग्रामीण भागातील मागासवर्गीय घटकांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणे अपेक्षित आहे; पण अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या वाट्याला आलेला निधी त्या घटकांच्या योजनांवर खर्च न करता तो केवळ विमुक्त जमातीच्या योजनांवरच खर्च करण्यात आला. सन २०१५-१६ मध्ये अशा प्रकारचा जवळपास ९० टक्के निधीचा हा घोळ समोर आला असून, यासंदर्भात संतापजनक प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

जिल्हा परिषदेत समाजकल्याण सभापती म्हणून शीला चव्हाण कार्यरत आहेत. समाजकल्याण विभागातील कर्मचारी आता सभापती पतींच्या पराक्रमाबाबत उघडपणे बोलत आहेत. सभापतींऐवजी त्यांचे पती विजय चव्हाण यांचा हस्तक्षेप प्रशासनामध्ये अवास्तव वाढला आहे. 'हम करे सो कायदा' या उक्तीप्रमाणे सभापती यांच्या पतीने समाजकल्याण विभागाच्या योजना राबवण्यासाठी तत्कालीन समाजकल्याण अधिकाऱ्यांवर दबाव आणला.

प्रामुख्याने सन २०१५-१६ मध्ये तत्कालीन समाजकल्याण अधिकारी जयश्री कवडे यांच्या जागेवर शासनाने डॉ. सचिन मडावी यांची प्रभारी समाजकल्याण अधिकारी म्हणून नियुक्ती केली. मडावी यांनी पदभार घेतल्यानंतर त्यांच्यावरही नियमबाह्य कामांसाठी मोठ्या प्रमाणात दबाव आणण्याचा प्रयत्न झाला.

मडावी यांनी सभापती पती यांच्या दबावाला बळी न पडता नियमबाह्य कामे उधळून लावल्याची बाब जिव्हारी लागल्यामुळे सभापती पतींनी मडावी यांनाही मग तेथून हटविले व त्यांच्या जागेवर समाधान इंगळे यांना समाजकल्याण अधिकारी पदावर आणले. दरम्यान, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, जमाती व अपंगांच्या उत्थानासाठी समप्रमाणात निधी खर्च न करता तो केवळ 'बंजारा' या एकाच घटकाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांवर खर्च केला. त्यास तत्कालीन समाजकल्याण अधिकारी समाधान इंगळे यांनी सर्वतोपरी सहकार्य केले. ही बाब नुकतीच चव्हाट्यावर आली असून यासंदर्भात महाराष्ट्र शासन, अनुसूचित जाती आयोग, विधिमंडळाची अनुसूचित जाती कल्याण समितीकडे तक्रार करण्याच्या हालचालींनी वेग घेतला आहे.

**प्रशासकीय मान्यताही रोखल्या**

समाजकल्याण विषय समितीच्या बैठकीत दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत २४० प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. त्यानंतर सभापती यांच्या पतीसह काही सदस्यांनी मंजुरी दिलेल्या सर्व प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश बेदमुथा यांच्यावर दबाव आणला.

बेदमुथा यांनी समाजकल्याण अधिकारी मडावी यांना नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, समाजकल्याण विषय समितीच्या बैठकीत मंजुरी दिलेल्या २४० प्रस्तावांपैकी १७० प्रस्ताव परिपूर्ण असून तेवढ्याच प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरीचा विचार केला जाईल. उर्वरित ७० प्रस्ताव दुरुस्तीसाठी 'बीडीओ' यांच्याकडे परत पाठविणार असल्याची भूमिका डॉ. सचिन मडावी यांनी घेतली आहे.

### दलित वस्तीमध्येही निधीची हेराफेरी

- जिल्ह्यातील ६० सर्कलपैकी एकट्या बिडकीन सर्कलमध्येच दलित वस्ती सुधार योजनेचा सर्वाधिक निधी खर्च झाला आहे. हे सर्कल समाजकल्याण सभापती चव्हाण यांचे आहे. त्यांचे पती विजय चव्हाण यांच्या दबावाला प्रशासन बळी पडले आणि लोकसंख्येनुसार २० लाखांपर्यंत निधी देण्याऐवजी तब्बल ३० लाख रुपयांचा निधी बिडकीन सर्कलमध्ये खर्च करण्यात आला.





- बिडकीनप्रमाणे जिल्ह्यात अन्य सर्कलमध्ये प्रमाणापेक्षा जास्तीचा निधी आणखी कुठे खर्च करण्यात आला. त्यास जबाबदार कोण, याची संपूर्ण चौकशी जि.प.चे मुख्य लेखा व वित्त अधिकारी उत्तम चव्हाण यांच्यामार्फत केली जात आहे. यासंदर्भात चव्हाण म्हणाले की, तीन-चार दिवसांत चौकशी पूर्ण झाल्यानंतर दोषींविरुद्ध जबाबदारी निश्चित केली जाईल.

# पंचायत राज विभागाचा दूरगामी संकल्प आराखडा

**विभागीय आयुक्तालय : तज्ज्ञ समितीची पार पडली बैठक**



पंचायत राज विभागाच्या बैठकीत मार्गदर्शन करताना माजी सनदी अधिकारी सुधीर ठाकरे, बैठकीस तज्ज्ञ गट समितीचे सदस्य सचिव अजय सावरीकर आणि इतर अधिकारी दिसत आहेत.

**औरंगाबाद : पंचायत** राज विभागाच्या आगामी दहा वर्षांसाठी दूरगामी संकल्प आराखडा तयार करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीची आज विभागीय आयुक्तालय कार्यालयाच्या सभागृहात बैठक झाली. ग्रामीण भागातील विकासाची तूट भरुन काढण्यावर यावेळी समितीचे अध्यक्ष माजी सनदी अधिकारी सुधीर ठाकरे यांनी भर दिला. त्यांच्याच अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. त्यांनीच बैठकीची भूमिका मांडली. दोन सत्रांत ही बैठक पार पडली. पाटोद्याचे सरपंच भास्कर पेरे, कडवंची, जिल्हा जालनाचे सरपंच बी. के. क्षीरसागर, गोळेगाव, ता. खुलताबादचे सरपंच संतोष जोशी यांनी बैठकीत केलेल्या सूचना मोलाच्या ठरल्या.

पंचायत राज संस्थांमधील अधिनियम, ग्रामपंचायतीकडे सोपविण्याचे विषय, ग्रामपंचायतीच्या स्वनिधी उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यासाठी सूचना तसेच न्याय पंचायत व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याची शक्यता व आवश्यकता आदींबाबत सुधीर ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच ग्रामपंचायत स्तरावरील मनुष्यबळ व्यवस्था, त्यांच्या नियुक्त्या,नेमणूक पद्धत, पंचायत निवडणुका, विकासासाठी स्पर्धा, विकास निधी वाटपाचे पारदर्शी निकष, देशासमोरील अत्यंत ज्वलंत प्रश्नांबाबत पंचायतींची भूमिका, राज्यात ग्रामपंचायतीच्या पुनर्गठनाची आवश्यकता, ग्रामीण मूलभूत सुविधा जिल्हा नियोजन प्रभावी करणे आदी विषयांवर प्रश्नावली देऊन मती जाणून घेण्यात आली.

बैठकीस तज्ज्ञ गट समितीचे सदस्य सचिव अजय सावरीकर, पोपटराव पवार, बाळासाहेब जगताप, मानवलोकचे द्वारकादास लोहिया, उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष धीरज पाटील, विभागीय उपायुक्त पारस बोथरा, सूर्यकांत हजारे, मराठवाड्यातील जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक आदींची बैठकीस उपस्थिती होती.

# हैं तय्यार हम...

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Brought to you by SAFFRON LANDMARKS

Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME



**मी धावणार माझ्यासाठी**

मी २१ कि.मी. मॅरेथॉनमध्ये उत्साहाने सहभागी होणार आहे. सर्वांना विनंती आहे की, मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याआधी सर्वांनी वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी. आपल्या हृदयासाठी आपल्याला धावायचे आहे.

-डॉ. अजय रोटे, सीईओ, सिग्मा हॉस्पिटल



**मित्तल ऑप्टिकल ग्रुप...** (डावीकडून) अमोल देवकते, नितीन दरबस्तवार, आशिष वाघचौरे, नीलेश मित्तल, अर्चना मित्तल, अश्विनी गर्गे, समीर खान पठाण, प्रशांत भालेराव.



**औरंगाबाद मीडिया क्लब...** (डावीकडून) अनुप अग्रवाल, मनोज पाटणी, राजू पाटील, रणजित शिंदे, अरुण मलिक, सुभाष शेळके, किशोर देसले, बाळासाहेब शिंदे, संदीप सोनार, श्रीपाद देशपांडे, संतोष लेनेकर, संजय धीवर, रमेश कोंदलकर



**सानिया डिस्ट्रिब्युटर्स...** (डावीकडून) अनिल प्रयाग, सय्यद अलीम, शेख फिरोज, राहुल अग्रवाल, वीरेंद्र अग्रवाल, पंकज अग्रवाल, कैलास पाटील, इब्राहिम शेख, नीलेश पाटील, संतोष बिनोरकर.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL
Supported by: औरंगाबाद पोलिस | Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE LIFE BEGINS HERE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd
Runner Partners: AURANGABAD BLACK BUCKS | GET GOING | Partners: रवि मसाले | blueumbrella

**नाव नोंदणीसाठी**

**www.mycitymarathon.com**

- **या वेबसाईटवर** ऑनलाईन प्रवेशिका भरण्याची सोय उपलब्ध आहे. मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथेही उपलब्ध करण्यात आली आहे.
- **अधिक माहितीसाठी** ०२४०-६६०४५०२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लोकमत मॅरेथॉन नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**11 डिसेंबर**

**हाफ मॅरेथॉन स्पर्धेत ८० विजेत्यांना 5,75,000 रुपयांपर्यंत बक्षीस**

औरंगाबाद : लोकमतच्या वतीने स्मार्ट सिटी असलेल्या औरंगाबाद शहरात ११ डिसेंबर रोजी भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**लष्कर आणि पोलीस दलांसाठी विशेष बक्षीसे**

**३ कि.मी. चालणाऱ्यांसाठी खास स्पर्धा**

| स्पर्धा | वयोगट | प्रकार |
|---|---|---|
| २१ कि. मी. | १८ ते ४० | पुरुष (खुला गट) भारतीय |
| | १८ ते ४५ | महिला (खुला गट) भारतीय |
| | ४० च्या वरील | पुरुष (वरिष्ठ गट) भारतीय |
| | ४५ च्या वरील | महिला (वरिष्ठ गट) भारतीय |
| | १८ ते ४० | पुरुष (परदेशी नागरिक) |
| | १८ ते ४५ | महिला (परदेशी नागरिक) |
| १० कि. मी. | १८ ते ४० | पुरुष (खुला गट) भारतीय |
| | १८ ते ४५ | महिला (खुला गट) भारतीय |
| | ४० च्या वरील | पुरुष (वरिष्ठ गट) भारतीय |
| | ४५ च्या वरील | महिला (वरिष्ठ गट) भारतीय |
| | १८ ते ४० | पुरुष (परदेशी नागरिक) |
| | १८ ते ४५ | महिला (परदेशी नागरिक) |






**पाहणी...** घाटीत उद्घाटनानंतर समुपदेशन केंद्रात पाहणी करताना अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के, डॉ. सुधीर चौधरी, डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. अरविंद गायकवाड आदी.

# लठ्ठपणाविषयी जनजागृतीपर कार्यक्रम

**औरंगाबाद : दिवसेंदिवस** वाढत जाणाऱ्या लठ्ठपणाच्या समस्येबद्दल जनजागृतीसाठी घाटी रुग्णालयातर्फे मंगळवारपासून विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन आले आहे. मंगळवारी लठ्ठपणाविषयी जनजागृती आणि मार्गदर्शन करणाऱ्या समुपदेशन केंद्राचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी उपअधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुधीर चौधरी, विभागीय शासकीय कॅन्सर हॉस्पिटलचे विशेष कार्यअधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. डोईबळे आदी उपस्थित होते. या समुपदेशन केंद्रात वजन नियंत्रणात का पाहिजे, कोणता आहार घ्यावा, लठ्ठपणा कसा रोखावा आदींविषयी मार्गदर्शन केले जात आहे.



लोकमत

RUN FOR A GOOD CAUSE : YOURSELF



ANAND CONSTRUCTION SINCE 1996 | लाभ | AURA CREATORS It's Creative...! | CORE CONSULTANTS | ZAMBAD BUILDERS & DEVELOPERS

4TH DECEMBER, 2016
PROMO-RUN
5 KM & 10 KM

प्रोमा-रन हे धावपटूंसाठी पूर्वतयारी आणि धावण्यासाठी स्वत: मधील कौशल्य सिद्ध करण्यासाठी एक संधी असणार आहे. या आठवड्यातील औरंगाबादमधील सर्वात मोठ्या हाफ मॅरेथॉनमध्ये भाग घेऊन तुमच्या नव्या अनुभवास प्रारंभ करा. कारण, ११ डिसेंबरच्या मार्गावरुन प्रोमो-रन धाव मार्ग असणार आहे.

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016
Brought to you by SAFFRON LANDMARKS
Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME
/AurangabadMarathon
www.mycitymarathon.com
#I RUN FOR MYSELF

विभागीय क्रीडा संकुल, सूतगिरणी चौक, गारखेडा, औरंगाबाद

वेळापत्रक : • सकाळी ६ वा. - १० कि.मी. मॅरेथॉनला सुरुवात
• सकाळी ६.१५ वा. - ५ कि. मी. मॅरेथॉनला सुरुवात
• नावनोंदणी मॅरेथॉन सुरुवात होण्याच्या १ तास अगोदर • प्रोमा-रन शुल्क : ₹५० (सर्व धावपटूंना बिब आणि नाश्ता)

नावनोंदणी www.mycitymarathon.com वर ऑनलाईन करु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका लोकमत भवन, जालना रोड येथे उपलब्ध। संपर्क : 0240-6604502

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA | श्री धनेश्वरी | VANSH GROUP | ERA INTERNATIONAL SCHOOL | Supported by: औरंगाबाद पोलिस | Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Runner Partners: AURANGABAD BLACK BUCKS | GET GOING | Partners: रवि मसाले | blueumbrella